# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./३५३४/२०२० दि. १० /१२/२०२०

**अत्यंत महत्त्वाचे/कालमर्यादित/तातडीचे**

## परिपत्रक

विषय :- दि. ०१ जानेवारी, २०२१ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम.

संदर्भ :- जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालयीन पत्र क्र कार्या- १०/ अ.का.ग्रापंनि/कावि/१६१३/२०२०, दि. ०८/१२/२०२०.

गडचिरोली जिल्ह्यातील गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये यांना सुचित करण्यात येते की, उक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने, भारत निवडणूक आयोगाने ०१ जानेवारी, २०२१ या अर्हता दिनांकावर आधारित विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहिर केला असून दि. १५ डिसेंबर, २०२० पर्यत दावे व हरकती स्विकारण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत. या अनुषंगाने दिनांक १२ डिसेंबर, २०२० (शनिवार) व दि. १३ डिसेंबर, २०२० (रविवार) या विहित दिनांकास विशेष मोहिमांचे आयोजन जिल्ह्यात करण्यात येत आहे.

करीता आपल्या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांचे वय दि. ०१ जानेवारी, २०२० रोजी १८ वर्ष पुर्ण होणार असेल त्या सर्व विद्यार्थ्यांचे संबंधित विधानसभा मतदार संघाचे मतदार यादीत नाव नोंदणी होण्याच्या दृष्टीने फार्म नमुना -६ भरुन आपल्या महाविद्यालयामार्फत संबंधित तहसिल कार्यालयात सादर करावे.

सोबत :- संदर्भिय पत्र.

१०/१२/२०२०
**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. उप जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, गडचिरोली.
४. मा. प्राचार्य, गडचिरोली जिल्ह्यातील संलग्नित सर्व महाविद्यालये.
५. आस्थापना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिल्हारे)** १०/१२/२०२०
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी गडचिरोली, यांचे कार्यालय

कॉम्लेक्स एरीया, गडचिरोली पिन कोड - ४४२६०५

दु. क्र. ०७१३२-२२२०११ / २२२०८६ Email-dydeogad@gmail.com

क्र. कार्या-१०/ अ. का. ग्रापंनि/कावि /१६९३/ २०२० दिनांक :- ०८ डिसेंबर, २०२०

प्रति,

मा. कुलगुरु,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :- ०१ जानेवारी, २०२१ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम.

संदर्भ :- अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयीन पत्र क्र. ईएलआर-२०२० /प्र.क्र. ३९५/२०/३३, दि. ०२/१२/२०२०

महोदय,

भारत निवडणूक आयोगाने ०१ जानेवारी, २०२१ या अर्हता दिनांकावर आधारित विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहिर केला असून दिनांक १५ डिसेंबर, २०२० पर्यंत दावे व हरकती स्विकारण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत. या अनुषंगाने दिनांक १२ डिसेंबर, २०२० (शनिवार) व दि. १३ डिसेंबर, २०२० (रविवार) या विहित दिनांकास विशेष मोहिमांचे आयोजन जिल्ह्यात करण्यात येत आहे.

करीता गोंडवाना विद्यापीठाचे कार्यक्षेत्रातील गडचिरोली जिल्ह्यामधील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांचे वय दिनांक ०१ जानेवारी २०२० रोजी १८ वर्षे पुर्ण होणार असेल त्या सर्व विद्यार्थ्यांची संबंधित विधानसभा मतदार संघाचे मतदार यादीत नाव नोंदणी होण्याचे दृष्टिने फार्म नमूना - ६ भरुन महाविद्यालयामार्फत संबंधित तहसिल कार्यालयात सादर करण्यास सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात यावे. ही विनंती.

आपली विश्वासु

उप जिल्हा निवडणूक अधिकारी
गडचिरोली

प्रतिलिपी :- १) मा. अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांना माहितीस सविनय सादर.
२) मा. आयुक्त नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
३) उप विभागीय अधिकारी (सर्व) --------------- यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.
४) तहसिलदार (सर्व) ------------------------ यांनी शाळा/महाविद्यालयांना आवश्यकतेप्रमाणे नमुना - ६ चा पुरवठा करावा.

उप जिल्हा निवडणूक अधिकारी
गडचिरोली

Scanned with CamScanner